# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

## कोविड-१९ विषाणूच्या प्रादूर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोजित

## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च-एप्रिल २०२२

# मुख्याध्यापकांसाठी विशेष मार्गदर्शक सूचना

## लेखी परीक्षा

१. **मार्च-एप्रिल २०२२** मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) ची लेखी परीक्षा **दिनांक १५/०३/२०२२ ते दिनांक ०४/०४/२०२२** या कालावधीत प्रचलित पध्दतीने (ऑफलाईन) आयोजित करण्यात आलेली आहे.

२. लेखी परीक्षा विद्यार्थ्यांच्या माध्यमिक शाळेतच घेण्यात येईल. १५ पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या ठिकाणी एकापेक्षा अधिक माध्यमिक शाळा एकत्र करून परीक्षा घेण्यात येईल. अशा प्रकरणी मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था त्यांना परीक्षेपूर्वी माहित करुन दयावी. कोणताही विद्यार्थी या कारणास्तव परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

एखादा विद्यार्थी आरोग्यविषयक कारणामुळे परीक्षेस गैरहजर राहिल्यास अशा गैरहजर विद्यार्थ्यांना मंडळामार्फत आयोजित पुरवणी परीक्षेस प्रचलित पध्दतीने प्रविष्ट होता येईल.

३. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीसह शाळा उशीराने सुरू झालेल्या आहेत. तद्नंतर काही ठिकाणी त्या वेळोवेळी बंद ठेवाव्या लागल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांचा लेखानाचा सराव पुरेसा होऊ न शकल्यामुळे लेखी परीक्षेतील पेपरचा वेळ या परीक्षेला ७० ते १०० गुणांच्या पेपरसाठी ३० मिनिटे व ४० ते ६० गुणांच्या पेपरसाठी १५ मिनिटे वाढविण्यात आला असून त्यानुसार अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले आहे.

४. या जादा वेळेव्यतिरिक्त पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या जादा वेळेसह इतर सर्व सुविधा व सवलती कायम राहतील. (उदा. तीन तासाच्या पेपरसाठी या परीक्षेला ३ तास ३० मिनीटे देण्यात आलेली आहेत. या वेळेव्यतिरिक्त पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सदर तीन तासाच्या पेपरसाठी ६० मिनीटे प्रचलित जादा वेळेची सवलत देय राहील.)

५. **सदर लेखी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना २५ टक्के कपात केलेला अभ्यासक्रम वगळून उर्वरित ७५ टक्के अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा दयावी लागणार आहे.**

६. परीक्षा केंद्रावर येणाऱ्या सर्व घटकांनी कोविड-१९ विषाणू प्रादूर्भावाच्या अनुषंगाने शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

७. इ.१० वी परीक्षा सकाळ सत्रात १०.३० वाजता व दुपार सत्रात ३.०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. त्यामुळे परीक्षार्थ्यांनी Thermal Screening साठी परीक्षेच्या प्रत्यक्ष वेळेपूर्वी किमान एक ते दीड तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचित करावे. परीक्षा केंद्राच्या मुख्यप्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांना प्रवेश देताना प्रथम परीक्षार्थ्यांसह परीक्षेशी संबंधित सर्व घटकांचे Thermal Screening द्वारे तापमान मोजण्यात यावे.

८. विद्यार्थ्यांचे तापमान तपासल्यानंतर प्रत्यक्ष पेपरच्या वेळेपूर्वी किमान ३० मिनिटे अगोदर म्हणजेच सकाळ सत्रात १०.०० वाजता विद्यार्थी आपल्या निर्धारित परीक्षा कक्षामध्ये बैठक व्यवस्थेच्या

ठिकाणी स्थानापन्न होणेबाबत सूचना देण्यात याव्यात. प्रत्यक्ष लेखी परीक्षा सुरु होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी देण्यात येईल.

९. परीक्षा केंद्रामध्ये पिण्याच्या पाण्याची व सॅनिटायझारची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तथापि, अधिक सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रात परीक्षेसाठी येताना स्वतःची पाण्याची बाटली व सॅनिटायझरची छोटी बाटली सोबत ठेवावी. तसेच मास्क व लेखन साहित्य (उदा-पेन, पेन्सिल, कंपास इ.) सुध्दा स्वतःसोबत आणणे आवश्यक राहील. परीक्षार्थी/विद्यार्थ्याने एकमेकांचे पेन, पेन्सिल, कंपास वापरु नये याबाबतच्या सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

१०. एखादा विद्यार्थी कोविड-१९ विषाणूने बाधित झालेला असल्यास अशा विद्यार्थ्याची माहिती केंद्रसंचालकांना अगोदर देण्यात यावी.

११. परीक्षेपूर्वी वा परीक्षेदरम्यान एखादया परीक्षार्थ्यास कोरोना प्रादुर्भावाच्या अनुषंगाने त्रास झाल्यास व त्याची परीक्षा देण्याची इच्छा असल्यास परीक्षार्थ्याच्या संमतीने त्याची परीक्षा केंद्रात स्वतंत्र कक्षात बैठक व्यवस्था करण्यात येईल.

१२. कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता खबरदारी म्हणून परीक्षा केंद्र/उपकेंद्राजवळील शासकीय आरोग्य केंद्रामार्फत आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागाला विनंती करण्यात यावी.

१३. परीक्षेदरम्यान दोन विद्यार्थ्यांमध्ये पुरेसे अंतर ठेवून बैठक व्यवस्था झिग-झॅग (Zig-Zag) पध्दतीने करण्यात येईल त्यामुळे विद्यार्थ्यांनी निर्धारित बैठक व्यवस्थेचे पालन करुन परीक्षा दयावी तसेच शारीरिक अंतर राखले जाईल याची दक्षता घेण्याबाबत विद्यार्थी व पालकांना सूचित करावे.

१४. प्रत्येक पेपरच्या वेळी परीक्षा केंद्र/उपकेंद्रात प्रवेश करताना व पेपर संपल्यावर बाहेर जातांना विद्यार्थ्यांनी गर्दी टाळण्याच्या दृष्टीने आरोग्यविषयक सर्व सूचनांचे पालन करण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचना दयाव्यात.

१५. कोविड -१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा परीक्षेचा ताण-तणाव कमी करण्याच्या अनुषंगाने विद्यार्थी, पालक व संबंधित घटक यांच्या शंकांचे निरसन व मार्गदर्शन करण्यासाठी राज्यमंडळ व विभागीय मंडळ स्तरावर स्वतंत्रपणे नियंत्रण कक्ष/हेल्पलाईन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच राज्यमंडळ व विभागीय मंडळ स्तरावर समुपदेशकही नेमण्यात आलेले आहेत.

उपरोक्त सर्व सूचना शाळेच्या दर्शनी भागातील नोटीस बोर्डवर, शाळेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात याव्यात तसेच शाळेने तयार केलेल्या विद्यार्थी व पालकांच्या व्हॉटस् ॲप ग्रुपवर प्रसिध्द् कराव्यात.

------------ *** ------------